# सहसंचालक, तंत्र शिक्षण, प्रादेशिक कार्यालय,
## शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३
E-mail:-atij_droamt@Sancharnet.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५५१३८८

---

अतितात्काळ
फॅक्सव्दारे/कालमर्यादा

क्र.विकाअ/शिक्षण/ईबीसी/२००८/ २६२
दिनांक : - २९-१-२००९

प्रति,

प्राचार्य,

१. विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये (पदवी), अकोला,चिखली, शेगांव,पूसद,यवतमाळ,बडनेरा, सिपना अमरावती, एचव्हीपीएम अमरावती, नांदूरकर यवतमाळ, ,दारापुर,बुलढाणा, पी.आर.पाटील अमरावती,चैतन्य बहु.अमरावती, इंदीरा बहु.घातखेडा, अमरावती.
२. विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, अकोला,अमरावती, चिखली, पूसद,यवतमाळ, मलकापूर
३. श्री.शिवाजी एज्यु. सोसा.चे वास्तुशास्त्र महाविद्यालय, अकोला
४. विनाअनुदानित एम.बी.ए. पदव्युत्तर पदवी संस्था, शेगांव,विद्याभारती अम, पी.आर.पाटील अम., सिपना अम, बडनेरा
५. विनाअनुदानित एम.सी.ए. पदव्युत्तर पदवी संस्था, एचव्हीपीएम अमरावती, यवतमाळ
६. विनाअनुदानित तंत्र निकेतने, अमरावती,बडनेरा, धामणगांव रेल्वे, पूसद, अचलपूर, अकोला, जवादे अम., कारंजा लाड
७. विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था, अमरावती ,चिखली,अकोला, यवतमाळ,पूसद,वणी, मारेगांव, .. दारव्हा, दिग्रस, उमरखेड, धामणगांव रेल्वे, मेहकर, देगांव.

विषय: - आर्थिक दृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती करण्याबाबत.

संदर्भ:- १.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा.नि.क्र. टिईएम/२००७/(४९६/०७)/तांशि-१,दि.१०.१२.२००७.
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.टिईएम-२००८/(१८४/०८)/ तांशि-१ दि.३०.६.२००८
३. मा.संचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.१५/आ.शै.प्र./२००८-०९/३५५, दि.२२.१.२००९

उपरोक्त विषयाला अनुसरुन कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २००६-०७ व २००७-०८ करीता विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागास वर्ग विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती संदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती विषद करण्यात आली आहे. सदर कार्यपध्दतीतील क्र.१ ते ३ ची कार्यपध्दती आपल्या संस्थास्तरावर करण्यात येऊन आपल्या संस्थेतील लाभार्थी विद्यार्थी संख्या व त्याकरीताचे अनुदान प्रतिपूर्ती रक्कम याची माहिती या कार्यालयास सादर करणेविषयी कळविण्यात आले. तद्नंतर संचालनालयाकडून मागणी केलेली प्रतिपूर्तीची रक्कम या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर आपल्या संस्थेचे संबंधित विद्यार्थ्यांचे अर्ज या कार्यालयात छाननीकरता पाठविण्याविषयी आदेशीत केले. आपणांकडून प्राप्त अर्ज, त्यातील त्रूटीरहित अर्ज व आपण मागणी केलेली विद्यार्थी संख्या यामध्ये प्रचंड तफावत असल्याचे निदर्शनास आले. याचाच अर्थ लाभार्थी विद्यार्थ्यांचे अर्जाची छाननी/तपासणी आपल्या कार्यालयामार्फत बिनचूक झालेली नाही, असा होतो. तात्पर्य आपण मागणी केलेले अनुदान आपली संस्था खर्च करु न शकल्याने शासनास प्रत्यार्पीत करावे लागल्याने वित्तिय अनियमितता झाली व याकरीता आपण व आपली संस्था सर्वतोपरी जबाबदार आहे. सदर अनियमिततेस आपण जबाबदार असल्याने आपणावर कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा खूलासा दिनांक २०.२.२००९ पावेतो सादर करावा. सदर खूलासा प्राप्त न झाल्यास अथवा समाधानकारक नसल्यास शैक्षणिक वर्ष २००८-२००९ करीता शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करणे शक्य होणार नाही, याची नोंद घ्यावी व त्याकरीता संबंधित विद्यार्थी व हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

शैक्षणिक वर्ष २००८-०९ करीता केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास वर्ग विद्यार्थ्यांच्या संदर्भ क्रमांक २ मधील शासन निर्णयान्वये शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याकरीता आपण या कार्यालयास लाभार्थी विद्यार्थ्यांचे अर्ज सादर केले आहेत. सदर अर्जाची छाननी आपल्या स्तरावर करण्यात आली असावी, असे या कार्यालयाचे मत आहे. सदर अर्जामध्ये काही त्रूटी आढळल्यास अथवा लाभार्थी विद्यार्थ्यांचे अर्ज या कार्यालयास पोहचले नसल्यास व पर्यायाने पात्र विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती न झाल्यास आपण व आपली संस्था जबाबदार राहील याची आपणास जाणिव करुन देण्यात येत आहे.

# सहसंचालक, तंत्र शिक्षण, प्रादेशिक कार्यालय,
## शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-atij_droamt@Sancharnet.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५५१३८८

---

तसेच आपणांस शैक्षणिक वर्ष २००८-०९ करीता आपल्या संस्थेतील आर्थिकदृष्टया मागास वर्ग लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या व त्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्तीची योग्य रक्कम या कार्यालयास **दिनांक ३०.१.२००९ रोजी संध्या. ५.०० वाजेपर्यंत फॅक्सद्वारे/हस्तदेय/इ-मेलद्वारे** विनाविलंब सादर करावी व असे करतांना नमूद संख्या व रक्कम ही बिनचूक आहे असे प्रमाणित करावे. अन्यथा यापूर्वी आपण मागितलेली रक्कम अंतिम समजण्यात येऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल आणि भविष्यात अनुदान शिल्लक राहिल्यास व पून्हा वित्तिय अनियमितता झाल्यास आपल्या संस्थेस जबाबदार धरुन परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, याची नोद घ्यावी.

सहसंचालक तंत्र शिक्षण
अमरावती.

प्रत:- मा.संचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई यांना माहितीकरीता सादर.